Cosmos Multidisciplinary Research E-Journal
Online Available at www.cmrj.in
Recognized International Peer Reviewed Journal
Impact Factor 4.94
ISSN No. 2456-1665

# अजिंठा भित्तिचित्रांचा चिरंतन ठेवा

डॉ. वनिता साबळे
सहाय्यक प्राध्यापक,
इतिहास विभाग,
महिला कला महाविद्यालय,
औरंगाबाद.

**प्रस्तावना:**

भारतीय चित्रकलेच्या गौरवशाली इतिहासाची सूरूवात भित्तिचित्रापासून होते. या भितीचित्राच्या माध्यमातून बौध्द चित्रकलेने भारतातच नव्हे तर जगात लोकप्रियता मिळविलेली आहे. अशा या ऐतिहासिक चित्रकलेचे आज अस्तित्वात असलेले सर्वात जूने अवशेष आढळतात ते फक्त अंजिठा येथे म्हणूनच अंजिठा येथील लेणीतील चित्रकलेला बौध्दकालिन चित्रकला असे नाव पडले. येथील चित्रकला ही रंग, विषय आणि उददेश हया सगळया दृष्टीकोनातून वेगळी आहे.येथे चित्रकला, स्थापत्यकला आणि मूर्तीकला यांचा अपूर्व संयोग आपल्याला बघायला मिळतो. ही लेणी भगवान बुध्दाच्या जीवनावरील भित्तीचित्रांसाठी प्रसिध्द आहे. युनेस्कोने याची नोंद वर्ल्ड हेरिटेज' मध्ये घेतलेली आहे. जे तत्कालीन भारतीय जीवनात व भावविश्वात होते त्या सर्वांचे प्रतिबिंब येथील चित्रकलेत उमटते, त्यामुळे बौध्द चित्रकलेचे भारतीय चित्रकलेमध्ये एक वेगळे महत्त्व राहिलेले आहे.

**अंजिठा लेणीचा इतिहास:**

सहयाद्री पर्वताच्या सातमाळा डोंगर रांगेत घोडयाच्या नालेचा आकार असलेल्या एका डोंगर उतारावर या लेणी खोदण्यात आल्या आहेत. इ.स. १८९९ मध्ये एक ब्रिटीश कॅप्टन जॉन स्मिथ या परिसरातील जंगलात शिकारीसाठी आला असतांना जंगलाने व्यापलेल्या या लेणी अचानक त्याच्या नजरेस पडल्या. येथे एकूण ३० लेणी असून इ.स.पू.२०० ते इ.स. ६५० या काळादरम्यान या लेणीचे खोदकाम करण्यात आलेले आहे. या लेणी बौध्द धर्मिय असून येथे बौध्द धर्मात अतिशय महत्वपूर्ण स्थान असलेल्या जातककथांवर आधारित चित्रे आहेत.येथील लेणीत दोन प्रकार आहेत: चैत्य व विहार, चैत्य म्हणजे प्राथनागृह किंवा मंदिर ९, १०, १९, २६ व २९ या लेणी चैत्यगृह आहेत. आणि विहार म्हणजे भिख्खूच्या वास्तवासाठी असलेले निवासगृह. पून्हा या लेणीच्या निर्मितीत दोन कालखंड पडतात : आधीचा हीनयान व नंतरचा महायान. ८, ९, १०, १२, १३ व १५ या सहा लेणी हीनयांनानी इ.स.पू. दूसरे ते इसवी सनाचे पहिले शतक या काळादरम्यान खोदल्या. तेव्हा महाराष्ट्रात शालिवाहनांचे राज्य होते.नंतर जवळपास चारशे वर्षे लेणीचे खोदकाम बंद पडले. पुढे महायानांनी इसावी सनाच्या चौथ्या शतकात

सुरूवात करून सहाव्या शतकापर्यंत पंचवीस लेणी खोदल्या तेव्हा महाराष्ट्रात वाकाटकांचे व उत्तरेत गुप्त साम्राज्य होते.

अंजिठा येथील काही लेणीची निर्मिती सुरूवातीला इ.स.पूर्व २०० च्या अगोदर झालेली होती. यामध्ये ९ व १० लेणीचा समावेश आहे. शुंगकाळात दक्षिण भारतात बौध्द कलेचा विकास कुठपर्यंत झालेला होता याचा पुरावा १० व्या लेणीतील चित्र पाहून समजते.या अवशेषांना पाहून अस अनुमान केल्या जावू शकते की शुंगकाळातील कला ही एका विशिष्ट शैलीवर आधारित आहे. दोन समकालीन ब्राम्ही लेखांच्या आधारावर १० व्या लेणीचा कालखंड हा इ. स. पूर्व २०० निश्चित केलेला आहे. ९ व्या लेणीतील चित्रामध्ये आभूषण घातलेली जी प्रतिमा आहे ती कोणत्यातरी अदिम जातिची सूचक आहे. यामूळे ९ व्या लेणीचा कालखंड इ.स.पू. २०० आहे. या ९ व्या लेणीतील चित्रामध्ये गौतम बौध्द आणि त्यांचे अनुयायी यांचे एक दृश्य आहे, याला अंजिठयाच प्राचीन चित्र म्हणून संबोधले जात. आणि एका वेगळ्या चित्रात काही स्त्रियांसोबत एका राजाच चित्र आहे, त्याच्या डोक्यावर सर्प असल्यामूळे ते नागराजचे चित्र असल्याचे समजत. त्यामागे काही परिचारकांचे सुद्धा चित्र आहे.त्यांनी भाले, धनुष्य-बाण, तलवार आणि परशू धारण केलेले आहे. आणि स्त्रिया संगित नृत्यच्या अवस्थेत आहे. त्यांनी हार कर्णभूषण हे अंलकार घातलेले आहेत. त्यांच्या केसांची रचना देखील दर्शनीय आहे.

सध्या १० व्या लेणीतील थोडेच चित्र सुरक्षित राहिलेले आहेत. या लेणीच्या भिंतीवर उजव्या बाजूला घ्यानस्थ राजा आणि त्याच्या अंगरक्षकांचे चित्र आहे त्याबरोबर काही नर्तकियांचे सुध्दा चित्र यात आहे. या लेणीच्या डाव्या भिंतीवर' षडन्त जातक' विषयक चित्र आहे आणि त्याच्या खाली एक अभिलेख अपूर्ण अवस्थेत आहे. तरीपण तज्ञांनी त्या लिपीचा अभ्यास करून तो अभिलेख इ.स.पू. २.०० पूर्वीचा असल्याचे मत व्यक्त करून असेही प्रामाणित केले की ९ व १० वी लेणी निर्मितीचा कालखंड सुध्दा एकच आहे. एका चित्रात राजा स्तूपाची पूजा करत असतांना काही अप्सरा त्या चित्राजवळ दाखवलेल्या आहेत. त्यांनी जो वस्त्राभूषण परिधान केलेला आहे तो ९व्या लेणीतील स्त्री-पूरूषांसमान आहे.

१,२,१६ आणि १७ या लेणीची निर्मिती वाकाटक नरेश हरिषेणचा सचिव वराहदेवच्या (४७५-५०० ) काळात झाली. १ली आणि १६ वी लेणी शिल्पातही साम्य ) आहे.यावरून त्यांची निर्मितीसुध्दा एकाच काळात झालेली दिसते. १७व्या लेणीची निर्मिती त्यानंतरची आहे. इ.स. ६०० नंतर २,२१,२५ व २६ या लेणीची निर्मिती झाली. पल्लव नरेश नरसिंहवर्मन द्वारा पुलेकेशी द्वितीय याला पराजित केल्यानंतर जवळपास इ.स. ६४२ पर्यत अंजिठा लेणीचे निर्मिती कार्य थांबलेल होत. अंजिठा लेणीतील चित्रकलेच्या निर्मितीत गूप्त सम्राटांच विशेष योगदान राहिलेल आहे. त्यांच्या कलेची साक्ष १, १६ व १७ वी लेणी आहे. अंजिठाच्या सर्वकला वैभवात त्यांच सर्वाधिक महत्व आहे. १ल्या लेणीतील अवलोकिश्वरच चित्र, १६व्या

लेणीतील गृहत्याग सबंधीच चित्र विशेष उल्लेखनीय आहे. येथील गुप्तकालीन चित्रात उत्कृष्ट रेखाटन, रंगाची विविधता व चित्रातील सजिवता प्रंशसत्रीय आहे.

**अंजिठा लेणीतील चिंत्राचा विषय :**

अंजिठातील चित्रकलेला प्रामुख्याने तीन भागात विभागले जाऊ शकत. १ आलंकारिक, २) रूपभैदिक आणि ३) वर्णनात्मक.

**१) आलंकारिक:** या चित्रामध्ये विविधता आहे. चित्राच्या सौदर्यात वृदिध करण्यासाठी कलाकारांनी पशु, पक्षी, फूल, वृक्ष, नदी, जंगल व डोंगर या नैसर्गिक सौदर्याचा उपयोग केलेला आहे. पशु मध्ये बैल, माकड, हरिण व हत्ती यांचा अंर्तभाव आहे. तर पक्षांमध्ये मोर, हंस, कोकिला यांच • सामावेश आहे. फळात आंबा, अंगूर, नारळ आणि केळ हे आहेत. आणि फुलात कमव्या उपयोग सर्वत्र केलेला दिसतो.

**२) रूपप्रधानता:** कलेच्या दृष्टिकोनातून ही श्रेणी महत्वाची आहे. यामध्ये मुख्यत्वे बुध्द व बोधिसत्व यांचा सामावेश होतो. यात १ ल्या लेणीतील विश्व विश्रुत बोधिसत्व पद्मपाणिच्या चिवाच। विशेष महत्व आहे. याचप्रमाणे ' माता-पुत्र' आणि राजकुमारी यांचे चित्र सुध्दा आकर्षक आहे. या प्रकारच्या चित्रातील आदर्श व भावप्रवणता विशेष उल्लेखनीय आहे.

**३) वर्णनात्मक:** या प्रकारच्या चित्रात १० व्या लेणीतील हस्ति-समूह आकर्षक आहे. याच्या एका बाजूला विशाल जन समूहाच चित्र आहे.यामध्ये जातक कथाच्या आधारावर भगवान बौध्दच्या जन्मापासून तर निर्वाण पर्यंतच्या सर्व घटनांचा विस्तार चित्रित करण्यात आलेला आहे. येथील चित्रामध्ये सजिवता आढळते.

**अंजिठा लेणीतील चित्रांचे वैशिष्टे**:

जागतिक कला इतिहासात अंजिठयाची चित्रकला अप्रतिम आहे. येथील चित्रकला त्या काळातला पट उलगडून दाखवते. त्यात केवळ कलाच नाही, तर महाराष्ट्रीय संस्कृतीतला धर्म, राजकारण आणि व्यापारही दृग्गोचर होतो. या चित्रकलेचे वैशिष्टये पूढीलप्रमाणे आहे.

**१) भावप्रवणता:** येथील चित्रात भावप्रवणतेला मुख्य स्थान आहे. यामध्ये शांती, करुणा, उल्लास, भक्ति, विनय आणि विकलता या प्रांजल भावनांना सूंदर कौशल्याने चित्रबध्द करण्यात आलेले आहे. बुध्दाची अंहिंसा, मैत्री, करूणा आणि उपेक्षा या भावनामधील सजीवता या चित्रांमधील विशेष गूण आहे. ही भावप्रवणताच येथील चित्राचा आत्मा आहे.

**२) रेखा सौष्ठव:** सुक्ष्म रेखाटन आणि उत्कृष्ट रंगाचा वापर यामूळेच अंजिठा येथील भित्तीचित्रांना भारताची सर्वोत्कृष्ट कलाकृती म्हणून मान्यता मिळालेली आहे. भिंतीवर प्रथम माती, शेण, भाताचा व

ताग हयांच्या वस्त्रगाळ मिस्त्रणाचा गिलवा लावत आणि त्याच्यावर पून्हा चून्याचा एक हलका थर चढवून त्यावर गेरूने प्रथम चित्रांची बाहयरेषा रेखाटत असे नंतर त्यात क्रमवार रंग भरीत.

**३) वर्णसंयोजन:** अंजिठा येथील चित्रात रंग संगती अत्यंत उत्कृष्ट केलेली आहे. यामध्ये गेरू, निळा, हिरवा, काळा, पीवळा, पांढरा आणि तांबडा या रंगाचा विशेष उपयोग केलेला आहे. यामधील बहूतेक रंग हे नैसर्गिक वस्तूंपासून बनवलेले आहेत. तर काही रंग खनिज आहेत. महायान काळात निळया रंगासाठी नीलमण्याचा वापर प्रथम करण्यात आला होता. हा मणी अफगाणिस्तानातून आयात करावा लागत. हे रंग पाण्यात किंवा अंडयाच्या चिकट बुळबुळीत बलकात मिसळून वापरले जात असे.

**४) नारीचे आदर्श रूप:** अंजिठ्यातील स्त्री रेखाटन कलेची अधिष्ठातृ देवी या आहे. येथील स्त्रीच्या मोहक प्रतिमा गौरवर्णी, श्यामलवर्णी व ताम्रवर्णी या रंगात रंगविलेल्या आहेत. या चित्रांच्या सौदर्याची जी प्रशंसा केली जाते त्याचे कारण स्त्री रेखाटनातील आध्यात्मिक आणि भौतिक दोन्ही प्रकारच्या सौदर्यांचा समन्वय आहे. स्त्रीचा यथायोग्य सन्मान दर्शविणारी ही कला आहे. यामूळेच हे भारतीयांचे आदर्श व गौरवांचे प्रतिक आहे.

**५) सामाजिक जिवनातील विविधतेचे दर्शन:** येथील चित्रापासून आपल्याला तत्कालीन जीवनाबदद्लची माहिती मिळते.त्या काळातील वेशभूषा, केशभूषा, अंलकार, वस्त्रे, संगीत साधने, खेळ, चालीरीती आणि स्थापत्य शास्त्राचे तपशीलवार विवेचन त्यातून मिळते. यावरून तत्कालीन समाजजीवन सुखी आणि समृदध होते हे समजते.तसेच गुप्त वाकाटक काळातील सुवर्णयुगाची साक्ष यावरून समजते.

**सारांश:**

जागतिक स्तरावर प्रसिध्द असलेल्या अंजिठा लेणीतील चित्रापासून आपल्याला तत्कालीन जीवन, अंलकार, वेशभूषा, जनजीवन, प्रकृति यांची माहिती मिळते.येथील चित्रांना मानवीय सजिवता आणि अधिक सौदर्यप्रदान करण्यासाठी कलाकारांनी कुठलीही कसर ठेवलेली नाही. येथे राहणारे, विहार करणारे बौध्द भिख्खूच नाही तर सामान्य दर्शक, उपासक सूध्दा बौध्द आणि बौध्द विषयक चित्र पाहून आपल्या जिवनात प्रेरणा मिळवतात. या अभिजात भारतीय चित्रकलेने संपूर्ण बौध्द जगतावर ठसा उमटला. तिचा प्रभाव श्रीलंकेतील सिगिरीया, अफगाणिस्थानातील बामियान, मध्य आशियातील खोतान व तुर्फान तसेच चीनमधील तुंनहांग या ठिकाणच्या चित्रकलेवर पडला. येथील चित्रकला ही जगातील प्राचीन अशा शिल्पकलेचा वारसा व अप्रतिम कलाकौशल्याचा एक आदर्श वास्तूपाठ आहे. आणि तो महाराष्ट्रीय आहे याचा रास्त अभियान वाटतो. या लेखाच्या निमित्ताने महाराष्ट्राच्या कलेतिहासाची स्मृति

जागवण्याच्या नम्र हेतूने हा संक्षिप्त आढावा मांडला आहे. या लेणीचे संरक्षण करण्यासाठी सरकार सध्या विशेष काळजी घेत आहे.

**संदर्भ:**

१) देशपांडे ब्रम्हानंद, अजिंठा, सांकेत प्रकाशन, औरंगाबाद.

२) कुलकर्णी अ.रा., प्राचीन भारत संस्कृती आणि इतिहास, देशमुख प्रकाशन, पुणे १९६२.

३) पाण्डेय धनपती, प्राचीन भारत का राजनीतीक और सांस्कृतीक इतिहास, मोतीलाल बनारसीदास, दिल्ली, १९९८.

४) उपध्याय उदयनारायण, तिवारी गौतम, भारतीय स्थापत्य एंव कला, मोतीलाल बनारसीदास,दिल्ली, २००७.

५) मिराशी वा.वि. वाकाटक नृपति आणि त्यांचा काल, नागपूर, १९५७.

६) गौरोला वाचस्पती, भारतीय चित्रकला का संक्षिप्त इतिहास, लोकभारती प्रकाशन, पटना.